# भारताच्या परराष्ट्र धोरणातील निर्धारक घटक''

**प्रफुल्ल लक्ष्मण किरवले**
संशोधक विद्यार्थी
लोकप्रशासन विभाग
डॉ. बा. आ. म. विद्यापीठ, औरंगाबाद

प्रस्तावनाः
भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हापासुन ते आजपर्यंत भारता समोर अनेक गंभीर समस्या आहेत. भारत पाकिस्तान विभाजनामुळे संरक्षण व्यवस्था, कृषी उत्पादन व्यवस्था व प्रशासन व्यवस्था विसकळीत झाली आहे. निर्वासितांचे पुर्नवसन, अंतर्गत दंगली व तज्ञ प्रशासक यांचा तुटवडा यासारखी आव्हाने निर्माण झाली आहेत. या सर्व अंतर्गत समस्याचा व घटकांचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धोरणावर पडलेला पुर्वीपासुनच दिसुन येतो. हि राष्टभवादातून निर्माण झालेले पाकिस्तान भरताविषयी शत्रुभाव पाळत असते. 1949 मधील क्रांतीनंतर चीनमध्ये सत्तेवर आलेल्या नव्या राज्यकर्त्यानी 1950 मध्ये तिबेटवर आक्रमण केले. त्यातुनच भारताच्या संरक्षणविषयक समस्या निर्माण झाल्या होत्या. अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांनी स्विकारलेल्या विचारप्रणालीचा प्रसार करण्यावर भर होता. यामुळे वसाहतवादाच्या वर्चस्वातून मुक्त झालेल्या भारत व अन्य देशासमोर आपल्या स्वतंत्र्य व सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याचा प्रश्न होता. या सर्वाचा परिणाम भारताच्या परराष्ट्र धोरणावर झाला.
जगातील कोणत्याही राष्टच्या परराष्ट्र धोरणाला निर्धारीत करताना काही घटक मूलभूत प्रमाणात प्रभातीत करीत असतात. हे घटक काही स्थायी तर काही अस्थायी स्वरुपाचे असतात. या सर्व घटकांचा संकलित परिणाम होऊन राष्टची परराष्ट निती ठरत असते. या घटकाच्या मूलभूत स्वरुपात परिवर्तन झाले तर त्यानूसार परराष्ट्र धोणातही बदल होतात. देश काल परिस्थितीनुसार प्रत्येक निर्धारक घटकांचे स्वरुप भिन्न असते. त्यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या निर्धारक घटकांची स्वतंत्रपणे चर्चा करणे आवश्यक ठरते. बदलत्या काळानुसार स्विकारलेले संदर्भ कालबाह्या ठरु शकतात आणि नवीन घटक अस्तित्वात येवू ' ाकतात. भारताच्या परराष्ट्र नितीला आधारभूत करणारे निर्धारक घटक निरपेक्ष असुन काल व संदर्भ सापेक्ष आहेत तसेच ते गतिशील सुद्धा आहेत.
भारताच्या परराष्ट्र धोरणातील निर्धारक घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**1. भौगोलिक घटकः**
असे म्हटले जाते की, पूर्विच्या काळी भारताचे संरक्षण उत्तरेला असलेला हिमालय, दक्षिणेकडील हिंदी महासागर, पुर्वेला असलेला बंगालचा उपसागर व पश्चिमेला असलेला अरबी समुद्र या नैसर्गीक सीमा करीत असत. स्वातंत्र्यानंतर भारत पाकिस्तान हे स्वतंत्र देश निर्माण झाले. तसेच 1971 मध्ये बांग्लादेशाची निर्मीती झाली. या राष्टबरोबरच सीमा या मानवनिर्मीत बनल्या. 1958 पासुन चीन राष्टानेही भारताबरोबर सीमावाद उकरुन काढला. अशा परिस्थितीत आज भारताचे भौगोलिक सीमांमुळे संरक्षण होऊ शकणार नाही. त्यातच मानवाने निर्माण केलेल्या सीमा या नेहमीच कटकटी निर्माण करताना दिसुन येतात. आज अतिविनाशक स्वरुपाची शस्त्रास्त्रे निर्माण झाल्यामुळे कोणतेच राष्ट सुरक्षित राहिलेले नाही. अशा बदलत्या भौगोलिक परिस्थितीचा परराष्ट् धोरणावर विपरीत परिणाम होतो. म्हणूनच परराष्टीय धोरण आखताना भौगोलिक घटकांचा विचार करावाच लागतो.

**2. ऐतिहासीक घटकः**
ऐतिहासीक अनुभव आणि सांस्कृतीक परंपरा यांचा राष्टाच्या परराष्ट धोरणावर ठसा उमठलेला असतो. एकसंध संस्कृती आणि देशातील सर्व भागांचे समान ऐतिहासिक अनुभव असतील तर त्या राष्टाला सातत्यपुर्ण परराष्ट्र धोरण आखणे सोपे जाते. मात्र सांस्कृतिक विविधतेसह भूतकाळात प्रत्येक प्रांताचे वेगवेगळ्याा काळात वेगवेगळे ऐतिहासिक अनुभव असतील तर परराष्ट्र धोरणात देशातील सर्व भूभाग व सुदायांच्या लोकांच्या चिंता तसेच इच्छा आकांक्षांना समाविष्ठ करणे ही तारेवरची कसरत होऊ ' ाकते. भारतासारख्या खंडप्राय देशाला आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करतांना सर्व प्रांतांना आणि त्यांमधील लोकांना जोडणाऱ्या समान दुव्याला सर्वोच्च स्थान देणे क्रमप्राप्त होते. भारताच्या बाबतीत हा समान ऐतिहासिक घटक होता वासाहतवाद विरोधी स्वातंत्र्य चळवळी स्वतंत्र्य आंदोलनात विकसित झालेल्या मूल्यांना आणि उष्टिांना परराष्ट्र धोरणाबाबत सार्वमत बनवण्यात यश मिळवले होते. काळाच्या ओघात भारताच्या परराष्ट्र धोरणात देखील सातत्य राखण्याच्या बाबतीत नवनव्या आव्हानांना तोंडावे लागत आहे. जागतिक अण्वस्त्र निःशस्त्रीकरणाची मागणी करत असतांना अण्वस्त्रधारी होते. इतर राष्टांच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्विकारले असतांना श्रीलंकेतील तामिळ नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नरत असणे इ. मुाचा ऐतिहासिक घटकात समावेश होतो.

**3. नैसर्गिक साधन संपत्तीः**
परराष्ट्र धोरणातील निर्धारक घटक म्हणुन आधुनिक काळात नैसर्गीक साधन संपत्तीला देखील महत्व प्राप्त झाले आहे. याचे कारण असे की, देशाचे परराष्ट्र धोरण आणि औाेगिक विकास हा त्या देशातील नैसर्गीक साधन संपत्तीवर अवलंबून असतो. नैसर्गीक साधन संपत्तीमध्ये शेती उत्पादन आणि खनिज संपत्ती यांचा प्रामुख्याने

अंतर्भाव होतो. यामध्ये प्रामुख्याने शेती उत्पादन, खनिज उत्पानद, वनस्पती व जलसंपत्ती असे घटक येतात.

भारत हा कृषीप्रधान देश म्हणुन ओळखला जातो. आज देखील देशातील सुमारे 60 टक्के लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष ' ोतीवर अवलंबुन आहेत. भारतरची शेती उत्पादकता तुलनेने खुपच कमी आहे. म्हणुनच काही वर्षापर्यंत आपल्या कृषीप्रधान देशाला अन्नधान्याच्या बाबतीत परकीय मदतीवर अवलंबून राहावे लागते. अनेक महत्वाच्या उद्धोग धांसाठी लागणारा कच्चामाल शेतीतुनच मिळत असतो, म्हणुन देशातील जनतेच्या अन्नधान्यावि" ायक गरजांची पूर्तता करण्याबरोबरच औद्योगीक विकासाला चालना देण्यासाठी देखील शेती व्यवसायाच्या विकासाकडे लक्ष देणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे नैसर्गिक साधनसंपत्तीचा दुसरा महत्वाचा घटक म्हणजे खनिज संपत्ती हा होय. खनिज संपत्ती हा देखील देशाच्या औ्योगिक विकासाशी संबंधित असलेला घटक आहे. खनिज संपत्तीच्या उपलब्धतेवर आणि प्रत्यक्ष उत्पादनावर देशाचा औद्योगिक विकास अवलंबून असतो. त्यामुळे खनिज संपत्तीचा देशाच्या परराष्ट धोरणाशी संबंध येतो. तसेच देशाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये व जलसंपत्ती याचाही समावेश होतो. या दोन्ही बाबतीत आपला देश तसा भाग्यवान आहे. वनस्पती व जलसंपत्ती यांचा आपण नियोजनपूर्वक व तरतम्याने वापर केला तर आपल्या गरजांची व्यवस्थित पुर्तता होईल अशी आपली स्थिती आहे.

### 4. विचार प्रणालीः

देशाच्या परराष्ट्र धोरणाला दिशा देण्यात विचार प्रणाली किंवा तत्वप्रणाली या घटकाने देखिल महत्वाची भूमिका बजावली आहे. अर्थात आंतरराष्ट्रीय समुदयातील सर्वच राष्ट्रे आपले परराष्ट्र धोरण ठरविताना विचार प्रणालीला महत्व देतात असे म्हणता येत नाही. बहुतेक देश आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांचा प्राधान्याने विचार करतात, जेणेकरुन आपले रा" ट्रीय हितसंबंध साधता येतील. अशाच प्रकारची धोरणे स्वीकारण्याकडे त्याचा कल असतो. तथापी, काही देश मात्र राष्ट्रीय हितसंबंधा इतकेच विचारप्रणालीला महत्व देताना दिसतात. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात सोव्हिएत युनियनच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणाऱ्या विचारप्रणाली म्हणुन उदारमतवाद, समाजवाद, गांधीवाद व आंतरराष्ट्रीय वाद यांचा निर्देश करावा लागतो. स्वातंत्र्य चळवळीच्या काळातही भारताच्या राष्ट्रीय नेत्यानी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने वरील तत्वांचा पाठपुरावा करणे चालुच ठेवले.

### 5. नेतृत्वः

देशाचे परराष्ट्र धोरण ठरविण्याचे कार्य शासनाचे पदाधिकारी करीत असतात. त्यामुळे परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात नेतृत्वाची भूमिकाही महत्वाची असते. आपल्या देशाच्या बाबतीत तर परराष्ट्र धारणाच्या निर्धारणात नेतृत्वाने महत्वपूर्ण भूमिका बजावली असल्याचे पहावयास मिळते. भारताला स्वातंत्र्य मिळााल्यानंतर देशाच्या नेतृत्वाची सुत्रे पंडित जवाहरलाल नेहरु हे देशाचे पंतप्रधान होते. तसेच ते परराष्ट्र मंत्री देखिल होते. त्यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण ठरविण्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. अर्थात देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावरच नेहरुंनी आंतरराष्ट्रीय प्रश्नात लक्ष घातले असे नसुन, स्वातँयपूर्व काळापासुनच त्यांची आंतरराष्ट्रीय प्रश्नात रस घेतला होता. पंडित नेहरुंनी घालून दिलेल्या मार्गावरुनच देशाच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल अजुनही चालू आहे असे म्हटल्यास ते चुकीचे होणार नाही, म्हणुनच पंडित जवाहरलाल नेहरु यांना भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हटले जाते.

### 6. आर्थिक आणि तंत्रज्ञानाचा विकासः

आर्थिक विकास आणि तंत्रज्ञानाची प्रगती ही एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. आद्योगिक विकासातून आर्थिकदृष्ट्याा संपन्न झालेले देश आधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्यात देखिल इतरांच्या तुलनेत खुप पुढे आहेत. आर्थिक उन्नती तंत्रज्ञानातील प्रगतिने देशाच्या परराष्ट्र धोरणाला आत्मविश्वास प्राप्त होतो. आणि आक्रमकपणे आपली उद्दिष्ट्यो प्राप्त करण्याचे परराष्ट्र धोरण आखणे शक्य होते. आर्थिक संपन्नता आणि तंत्रज्ञानाच्या विकासाच्या जोरावर देशाचे लष्करी सामर्थ वाढवो सहज ' ाक्य होते. आणि सैन्य ' ाक्ती विकसीत करण्यासाठी इतर राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबुन राहण्याचे प्रमाण कमी होते. दुसरीकडे गरजु देशांवर आपला प्रभाव पाडणे आणि घनिष्ट मैत्रीपुर्ण संबंध प्रस्थापित करणे प्रगत देशांना शक्य होते. अविकसीत राष्ट्रांना तसेच विकसीनशील राष्ट्रांना परराष्ट्र धोरण ठरवताना आर्थिक तांत्रिक दृष्ट्याा प्रगत देशांकडून मिळणाऱ्या मदतिची गंभीर दखल घेणे हे अपरिहार्य आहे. भारत आणि चीन सारख्या राष्ट्राच्या जागतीक पटलावरील बहुचर्चित उदयामागे या दोन्ही देशांनी अलीकडच्या काळात केलेली आर्थिक प्रगती आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेली प्रगती हे आहे. याविरुद्ध सोवियत संघाच्या विघटनानंतर रशियाचा औद्योगिक विकास मंदावल्याने जागतिक राजकारणात या देशाची थोडी अधोगती झालेली आहे.

### 7. सैन्यशक्तीः

कोणत्याही राष्ट्राचा दर्जा हा त्यांच्याकडे असलेल्या ल" करी शक्तीवर अवलंबुन असतो. भारतीय सैन्यांना प्राचीन परंपरा आहे. इग्रंजांनी याच सैन्यांच्या जोरावर भारतीय वसाहतीचे शत्रुपासुन संरक्षण केले. इंग्रजांच्या हितासाठी हेच भारतीय सेना जगाच्या कानाकोपऱ्यात जावून लढली. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात भारतीय सैन्याने आपले शौर्य पणाला लावलेले दिसते.

स्वातंत्र्यानंतरही पर्वतीय प्रदेशात कसे लढावे याचे प्रशिक्षण नसतांनाही त्यांनी पाकिस्तानच्या अतिरेक्यांपासुन काश्मीरचे संरक्षण केले. चीनच्या अपवाद वगळता 1965, 1671 व कारगील युद्धातही भारतीय सेनेने आपले शौर्य पणाला लावले. आजची परिस्थिती पाहता भारताच्या चारही बाजूला अण्वस्त्रधारी राष्ट्रे आहेत. भारतीय सैन्य शक्तीला प्रबळ बनवण्याच्या हेतूने भारतानेही आपल्या परराष्ट्रीय धोरणात बदल करुन

अण्वस्त्रधारी बनायला हवे तरच आपण आपल्या राष्ट्राच्या संरक्षणात यशस्वी होऊ.

**8. लोकसंख्याः**

परराष्ट्र धोरणाच्या निर्धारक घटकामध्ये सर्व घटकाबरोबरच लोकसंख्या या घटकाचाही विचार करणे तितकेच महत्वाचे आहे. जगामध्ये आज भारत लोकसंख्येच्या बाबतीत चीननंतर दुसऱ्या स्थानावर आहे. त्यामुळेच जागतिक आणि दक्षिण आशियाच्या राजकारणात भारताला विशेष महत्वाचे स्थान असलेले दिसुन येते. कोणत्याही रा" ट्राची लोकसंख्या कमी जास्त असणे हे सुद्धा परराष्ट्र धोरणाला एखाद्या वेळी धोकादायक ठरु शकते. कारण नैसर्गिक असमतोल बिघडलातर पुरेसे अन्नधान्य याचा तुटवडा भासु शकतो. पर्यायाने त्या राष्ट्रास इतर रा" ट्रांकडून अन्नधान्य आयात करावे लागते अशावेळी राष्ट्राला आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करावा लागतो यामुळे लोकसंख्या या घटकाचे महत्व देखिल अनन्यसाधारण आहे.

**9. आंतररष्ट्रीय राजकारणाची परिस्थितीः**

प्रत्येक राष्ट्राला आंतररष्ट्रीय राजकारणाच्या स्वरुपात स्वतःचे अस्तित्व व हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. राष्ट्राचे स्वातँय, सार्वभौमत्व व सुरक्षितता कायम राखण्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणाची स्थिती लक्षात घेऊन परराष्ट्रनितीची उष्ट्यिे निश्चित करावी लागतात.

**10. लोकमत व प्रसारमाध्यमेः**

भारतीय परराष्ट्र धोरणाच्या निर्धारीत घटकांचा विचार करता लोकमत व प्रसारमाध्यमे यांची भूमिका महत्वपूर्ण आहे. आंतरराष्ट्रीय घटना आणि घडामोडीबाबत जनतेच्या क्रिया प्रतिक्रियांना लोकशाही व्यवस्थेत महत्व असते. लोकांच्या आंतरराष्ट्रीय राजकारण व घटना घडामोडीबाबतच्या या प्रतिक्रियांनाच लोकमत असे म्हटले जाते. भारतासारख्या लोकशाही प्रधान देशात लोकमताला डावलून परराष्ट्रधोरण निश्चित करता येणे कठीण आहे. त्यामुळे अलिकडे माहिती व तंत्रज्ञानाच्या प्रचंड प्रगतीमुळे विकसित झालेल्या प्रसारमाध्यमांच्या आधारे लोकमत निर्माण केले जाते आणि परराष्ट्र धोरण निर्धारीत केले जाते. प्रसारमाध्यमांमध्ये प्रिंट मिडीया आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया आंतरराष्ट्रीय लोकमत बनविण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावताना दिसतात.

**11. लोकांच्या जीवितेचे व वित्ताचे संरक्षणः**

लोकांच्या जिवितेचे च मालमत्तेचे संरक्षण हे भारतीय परराष्ट्रीय धोरणाचा महत्वाचा निर्धारक घटक असुन तो राष्ट्रीय हीताचाच एक घटक आहे. राष्ट्रजसे भूमिवर उभे असते तसेच त्या भूमिवर राहणारे लोक हाही राष्ट्राचा अविभाज्य भाग असतो. जिवित व वित्ताचे रक्षण ही बाब केवळ ही आपल्या देशात राहणाऱ्या लोकांपुरतीच मर्यादीत नसुन भारताच्या बाहेर परदेशात राहणाऱ्या लोकांच्याही जिवीत व विताची सुरक्षितता हाही परराष्ट्रीय धोरणाचा महत्वपुर्ण घटक आहे.

**12. इतर घटकः**

भारताच्या परराष्ट्राच्या धोरणाच्या निर्मितीत वरील निर्धारीत घटकाबरोबरच राष्ट्रीय विकास, सामाजिक स्वरुप, आर्थिक साधने, मान्यवर व्यक्तींचा प्रभाव, जागतिक जनमत, आंतरराष्ट्रीय परिस्थिती, विधिमंडळाचे धोरण, इंटरनेट व प्रसारमाध्यमे, जागतिक परिस्थीती इ. घटक देखील राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण ठरविण्यास महत्वपुर्ण भूमीका बजावतात.

**सारांशः**

जागतिक पातळीवर सर्वच राष्ट्रे आपले राष्ट्रीय धोरण हे हितसंबंध आणि सुरक्षितेकरिता उपलब्ध परिस्थितीनुसार व वस्तुनिष्ठ घटकांचा विचार करुन ठरवित असताना दिसुन येतात. यामुळे राष्ट्राचे हितसंबंध, राष्ट्रीय सुरक्षा, सार्वभौम आणि आर्थिक, सामाजिक, राजकिय, ऐतिहासीक, विकास व आंतरराष्ट्रीय पातळी व राजकिय पकड मजबुत करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतात. भारताचा आध्यात्मीक वारसा व मानवतावादी इतिहास एक सहनशील, उदारमतवादी, अहिंसात्मक तत्वावर आधारित विचारप्रणालीच्या निर्मीतीला कारणीभूत झालेला असुन त्यामुळेच भरताचे परराष्ट्र धोरण आक्रामक स्वरुपाचे नसुन शांततामय सहजीवनावर आधारलेले दिसुन येते. त्याच प्रमाणे भारतेचे परराष्ट्र धोरण हे पाकिस्तान वगळता इतर राष्ट्रांच्या संदर्भात ल" करकेंद्रि नसुन राजनैतिक संबंधावर आधारलेले आहे.

**संदर्भः**

1. *दीक्षित जे. एन., भारतीय विदेशनिती, प्रभात एग्जाम, नई दिल्ली, 2021.*
2. *भारताचे परराष्ट्र धोरण, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 2018.*
3. *तोडकर बी. डी., आंतरराष्ट्रीय संबंध, भारताचे परराष्ट्रीय धोरण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2017.*
4. *देवळाणकर शैलेंद्र, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.*
5. *लोटे रा. ज., भारताची विदेशनीती, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर.*